आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

९ एप्रिल २०२४ - मंगळवार

## <u>ठळक बातम्या</u>

- महाविकास आघाडीचं जागावाटप जाहीर, उद्धव ठाकरे २१, काँग्रेस १७ आणि शरद पवार १० जागांवर उमेदवार देणार

- राज्यभरात गुढीपाडव्याचा उत्साह, विविध ठिकाणी शोभायात्रा काढून नागरिकांकडून सण साजरा

- सेन्सेक्सनं ७५ हजारांच्या विक्रमी पातळीला ओलाडल्यानंतर शेअर बाजारात नफेखोरीमुळं घसरण

**आणि**

- विदर्भ आणि मराठवाड्यातल्या अनेक जिल्ह्यात गारपीटीसह अवकाळी पावसानं पीकांचं नुकसान

<><><><><><>

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्रात महाविकास आघाडीनं जागावाटप आज जाहीर केलं. त्यानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष २१, काँग्रेस १७ जागा आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष १० मतदारंघात उमेदवार उभे करणार आहे. मुंबईत शिवालय इथं शिवसेना नेते संजय राऊत यांनी ही माहिती दिली. मुंबईत दक्षिण मध्य, वायव्य, दक्षिण आणि ईशान्य मुंबई अशा ४ जागांवर शिवसेना तर उत्तर आणि उत्तर मध्य अशा २ जागांवर काँग्रेस लढणार आहे. या बरोबरच **नंदुरबार, धुळे, अकोला,**

**अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली - चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापुर, रामटेक** अशा एकूण १७ जागा काँग्रेस लढणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बारामती, **शिरूर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर आणि बीड** या जागांवर लढणार आहे. शिवसेना मुंबईच्या चार जागांबरोबरच **जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, उस्मानाबाद, रत्नागिरी, बुलडाणा, हातकणंगले, औरंगाबाद, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ वाशिम** या जागा लढवणार आहे. सर्व घटक पक्ष एकदिलानं लढून विजय मिळवतील, असा विश्वास यावेळी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला. यावेळी शरद पवार, उद्धव ठाकरे, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, शेकापचे जयंत पाटील, शिक्षक नेते कपिल पाटील यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><><><>**

गेल्यावेळी राज्यात भाजपाचे २३, शिवसेनेचे २८, राष्ट्रवादी काँग्रेसचे ४ यांच्याशिवाय इम्तियाज जलील आणि नवनीत राणा खासदार म्हणून निवडून आले होते. २१ जागांवर काँग्रेस, १४ जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस, ५ जागांवर शिवसेना, प्रत्येकी दोन जागांवर भाजपा, वंचित बहुजन आघाडी, स्वाभिमानी शेतकरी संघटना यांचे उमेदवार दुसऱ्या क्रमांकावर होते.

महाविकास आघाडीनं आतापर्यंत ४८ पैकी ४२ ठिकाणी उमेदवार दिले आहेत. गेल्यावेळी खासदार निवडून आलेल्या किंवा पक्षाचा उमेदवार दुसऱ्या जागेवर असलेल्या आपापल्या बहुतांश जागा महाविकास आघाडीतल्या पक्षांनी कायम ठेवल्या आहेत. मात्र **अमरावती, भंडारा-गोंदिया, भिवंडी, कोल्हापूर, ईशान्य मुंबई, रावेर आणि वर्धा** या ७ जागा त्याला अपवाद आहेत. **भिवंडी, रावेर आणि वर्धा** या गेल्यावेळेच्या काँग्रेस कडच्या जागा शरद पवारांच्या पक्षाला मिळाल्या आहेत. **कोल्हापूर आणि भंडारा-गोंदिया** या गेल्यावेळची शरद पवारांच्या पक्षाची जागा काँग्रेसकडे गेली आहे. **अमरावतीची** जागा उद्धव ठाकरेंच्या पक्षाकडून काँग्रेसकडे गेली आहे. ईशान्य मुंबईची जागा शरद पवारांकडून उद्धव ठाकरेंकडे गेली असली तर संजय दिना पाटील हे उमेदवार कायम आहेत.

**<><><><><><>**

गडचिरोली जिल्ह्यात माओवाद्यांचा धोका लक्षात घेऊन, जिल्हा प्रशासनानं लोकसभा निवडणुकीसाठी भारतीय हवाई दलाकडे ५ हेलिकॉप्टरची मागणी केली आहे. निवडणुकीशी संबंधित कामांसाठी हवाई दल सामान्यत: १ किंवा २ हेलिकॉप्टर पुरवतं. मात्र निवडणुकीदरम्यान मतदान पथकांवर हल्ला होण्याची शक्यता असल्यानं अतिरिक्त हेलिकॉप्टर तैनात करण्याची मागणी केली, त्यानुसार भारतीय हवाई दल गडचिरोली आणि इतर भागांमध्ये निवडणूक प्रक्रियेसाठी रायपूर आणि नागपूर येथून ५ हेलिकॉप्टरची व्यवस्था करेल.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण नांदेड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

चैत्र शुक्ल प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्याचा सण आज राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा झाला. घरोघरी गुढ्या उभारुन, मिष्टान्नाचं भोजन करुन,शोभिवंत रांगोळ्या काढून,  एकमेकांना शुभेच्छा देत हा सण साजरा करण्यात आला. विविध मंदिरांमधे दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. साडेतीन मुहूर्तांपैकी वर्षातला पहिलाच मुहूर्त असल्याने सोन्याचांदीची, नवीन वास्तूची तसंच भेटवस्तूंची खरेदी या दिवशी केली जाते. शालिवाहन शके १९४६ या नवीन वर्षाची सुरुवात आजपासून झाली असून नवीन वर्षाचं स्वागत करण्यासाठी राज्यात ठिकठिकाणी शोभायात्रा काढण्यात आल्या होत्या. समृद्ध मराठी परंपरा दर्शवणारी वेशभूषा, ढोल ताशांचं संगीत, स्थानिक दैवतांच्या पालख्या, मैदानी आणि मर्दानी खेळांचं सादरीकरण ही या शोभायात्रांची वैशिष्ट्य. अनेक ठिकाणी राजकीय नेत्यांनीही

गुढीपाडव्यानिमित्त आयोजित कार्यक्रमांमधे सहभाग नोंदवला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे शहरात निघालेल्या शोभायात्रेत कौपिनेश्वराची पालखी खांद्यावर घेतली.

**मुंबईत** गिरगाव, दादर, बोरिवलीत विविध संकल्पनांवर आधारित शोभा यात्रा निघाल्या. धारावीत पुनर्विकासाची गुढी उभारली गेली.

**ठाणे जिल्ह्यात** डोंबिवली, कल्याण इथंही नववर्ष स्वागत यात्रा निघाल्या.

**पुण्यात** विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं.

**रत्नागिरीत** ग्रामदैवत भैरी मंदिरापासून जयस्तंभापर्यंत शोभायात्रा काढली गेली.

**शिर्डी इथं** साईबाबा मंदीरात विधवत पूजेनंतर कळसावर गुढी उभारली गेली.

**कोल्हापूरच्या** महालक्ष्मी मंदिरात चैत्री नवरात्र प्रारंभानिमित्त देवीची सालंकृत पूजा हापूस आंब्यांनी बांधण्यात आली.

**धुळ्यात** शोभायात्रे दरम्यान मतदारजागृतीचे उपक्रमही झाले. **परभणीत**ही मतदान करण्याचा संदेश देणारी गुढी उभारण्यात आली.

**बीड मध्ये सर्वधर्मीयांच्या सहभागानं** स्वागत फेरीत सहभागी झाली. **अकोल्यात** बाईक रॅली आणि रथयात्रेत नागरिक फेटे परिधान करून सहभागी झाले.

**सांगलीत** नववर्षाच स्वागत करण्यासाठी गुढीपाडव्या निमित्त भक्ती तसच देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम झाला.

**<><><><><><>**

देशातल्या शेअर बाजारांनी आजही नव्या उच्चांकांना स्पर्श केला. त्यानंतर नफेखोरी झाल्यानं दिवसअखेर सेन्सेक्स ५९ अंकांची घट नोंदवून ७४ हजार ६८४ अंकांवर आणि निफ्टी २४ अंकांची घसरण नोंदवून २२ हजार ६४३ अंकांवर बंद झाला.

सकाळी व्यवहार सुरू झाल्यावर सेन्सेक्सनं पहिल्यांदाच ७५ हजारांची पातळी ओलांडली. व्यवहारादरम्यान सेन्सेक्सनं ७५ हजार १२४ अंकांच्या विक्रमी पातळीला स्पर्श केला. निफ्टीनंही २२ हजार ७६८ च्या विक्रमी पातळीला आज स्पर्श केला होता. त्यानंतर गुंतवणूकदारांनी नफा काढून घ्यायचं ठरवल्यानं शेअर बाजारात घसरण झाली. ६० हजारापासून ते 70 हजारांची पातळी गाठायला सेन्सेन्सला ५४८ दिवस लागले आणि ७० हजारापासून ७५ हजारापर्यंतचा प्रवास ८२ दिवसात झाला. मुंबई शेअर बाजारातल्या २३९ समभागांनी आज वर्षभरातली उच्चांकी पातळी गाठली.

**<><><><><><>**

**अकोला** जिल्ह्यात आज विजांच्या कडकडाट आणि सोसाट्याच्या वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. त्यामुळे शेतमालाचं तसंच अंबा आणि इतर फळबागांचंही नुकसान झाले आहे.

**अमरावती** तालुक्यात आज सकाळी गारांसह पाऊस पडला. काही गावांमध्ये मोठ्या, तर काही ठिकाणी छोट्या स्वरूपात गारा पडल्याचं समजतं. या गारपिटीमुळे कांदा, गहू, भाजीपाला, केळी, गावरान आंबा, संत्री या पिकांचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं असल्याचं वृत्तसंस्थेच्या बातमीत म्हटलं आहे.

**लातूर** शहर आणि परिसरात आज संध्याकाळी वादळी वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस बरसला. या पावसामुळे अनेक ठिकाणी आंब्याच्या पिकांचं नुकसान झाल्याचं वृत्त आहे.

**नांदेड**मध्येही आज संध्याकाळी हलका पाऊस झाला. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला.

**परभणी** जिल्ह्यात सर्वत्र विजेचा कडकडाटासह आणि वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस पडला. त्यामुळे ज्वारी, हरबरा या पिकांचं, तसंच अंबा, द्राक्ष इत्यादी फळबागांचं नुकसान झालं आहे.

**<><><><><><>**

आयपीएल मध्ये आज पंजाब किंग्ज्स आणि सनराजयझर्स हैद्राबाद यांच्यात सामना होणार आहे. मुल्लानपूर इथल्या महाराजा यादविंद्र सिंग स्टेडिअमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

पंजाब किंग्ज्सनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><><>**

गेल्या २४ तासात  विर्दभात काही ठिकाणी पाऊस पडला, आणि कमाल तापमानात किंचित घट झाली.

येत्या दोन दिवसात विदर्भात काही ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><><>//